■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३२१ ■ शुक्रवार दि.८ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 321 ■ Friday Dt. 8 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# म्हाळसपिंपळगावात १२ वाळू साठे जप्त, पण कोणताही गुन्हा दाखल नाही; महसूल प्रशासनाच्या कारवाया केवळ दिखावा?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# गेवराईत वाळू माफियांचा धुमाकूळ, तहसीलदार संदीप खोमणेंच्या मूक भागीदारीनेच सुरु आहे काळा धंदा?

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, वाळू तस्करी प्रकरणात हलगर्जीपणा करणाऱ्या तहसीलदारावर कारवाई करणार का?

## तहसीलदार खोमणेंनी डोळेझाक केली की 'डील' झाली? वाळू तस्करीवरून संशय गडद!

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यात वाळू माफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, महसूल प्रशासन मात्र हातावर हात ठेवून बसल्याचे चित्र दिसत आहे. म्हाळसपिंपळगाव परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असतानाही कारवाई अपुरी असून, गुन्हे दाखल न करता केवळ १२ वाळू साठा जप्त करण्यापुरती मर्यादित आहे. यामुळे महसूल अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, तहसीलदार संदीप खोमणे यांच्या भूमिकेबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. वाळू तस्करांवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे. १२ वाळू साठे जप्त केला असला, तरी आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकाही प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत. महसूल प्रशासनाच्या या अपूर्ण कारवाईवर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.



अवैध वाळू माफियांना पाठीशी घालून केवळ दिखाऊ कारवाई केली जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावर संशयाची सुई फिरू लागली आहे. त्यांचे या प्रकरणातील संभाव्य मूक समर्थन, दुर्लक्ष किंवा सहकार्य याबाबत अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण झाले आहेत. राज्य शासनाने वाळू तस्करीसंदर्भात कडक पावले उचलण्याच्या सूचना दिल्या असतानाही, स्थानिक महसूल प्रशासन मात्र केवळ साठा जप्त करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र आहे. महसूल विभागाने अलीकडे केलेल्या कारवाईत तब्बल १२ वाळू साठे जप्त करण्यात आले, मात्र धक्कादायक बाब म्हणजे या प्रकरणात एकाही तस्करावर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे ही कारवाई केवळ कागदावर पुरती मर्यादित होती का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

स्थानिक नागरिकांनी महसूल प्रशासनाच्या या अर्धवट भूमिकेवर संताप व्यक्त करत, ही कारवाई माफियांना वाचवण्यासाठीच केली गेली असल्याचे सांगितले जात आहे. याप्रकरणी आता तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावर संशयाची सुई फिरू लागली असून, त्यांच्या संमतीशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा होणे शक्य नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे. राज्य शासनाने वाळू तस्करी रोखण्यासाठी कडक नियमावली लागू केली असून, यंत्रणांना कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्षात मात्र महसूल प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे वाळू माफियांना मोकळे रान मिळत आहे. आता तरी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जावी, अशी मागणी गावकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरण प्रेमींनी केली आहे.



## बीड जिल्ह्यामध्ये ४९ पोलीस नाईक आणि २० पोलीस हवालदारांना पदोन्नती





**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांनी जिल्ह्यातील ४९ पोलीस नाईकांना पोलीस हवालदार पदावर आणि २० पोलीस हवालदारांना सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती दिली आहे. पदोन्नतीचा तपशील पोलीस नाईक (झछ) ते पोलीस हवालदार (क्ष) पदी पदोन्नती मिळालेल्या ४९ अंमलदारांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे: मपोना/१८३८ आशा आप्पाराव चांदणे, मपोना/१८४० सविता पांडुरंग राऊत आणि मपोना/२८५ गिरिजा बाब्रुवण सर्यवंशी. पोलीस हवालदार (क्ष) ते सहायक पोलीस उपनिरीक्षक (–ड्ख) पदी २० अंमलदारांना पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नती झालेल्या सर्व पोलीस अंमलदारांचे पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांनी अभिनंदन केले आहे.

## ग्रामसेवक मुसळेच्या हलगर्जीपणामुळे धोंडराईत संताप

### ग्रामसेवक आणि सरपंच यांच्या स्तरावर संगणमत

**गेवराई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात काम करण्यास अनेकांची तयारी नसते. त्यातच ग्रामसेवकावर एका ग्रामपंचायतीपेक्षा अनेक ग्रामपंचायतींची जबाबदारी असते. अनेक गावात ग्रामसेवक हजर राहात नसल्याच्या तक्रारींचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे कामांचा खोळंबा वाढला आहे. हे टाळण्यासाठी ग्रामसेवकांनी मुख्यालयाच्या ठिकाणी थांबावे. यामुळे अधिकारीवर्गाला नाहक त्रास होतो तसेच धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयाच्या समस्यांकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही. म्हणून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी यापुढे ग्रामसेवकांबाबत कोणी तक्रारी केली अथवा कामात अडथळा निर्माण केल्यास चौकशी करून निर्णय घेण्यात येणार असल्याचे प्रत्येक



पंचायत समितीला पत्राद्वारे कळविण्यात आलें मात्र ग्रामपंचायत कार्यालयाच्या इतर कामासह कार्यालयात उपस्थित न राहता तसेच स्वतंत्र दिन जवळ आला असताना रंगरंगोटी बाबत अध्याप त्यांनी कुठलाही निर्णय घेतला नाही स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ग्रामपंचायत कार्यालयात थुंकल्याने भिंती व सर्वत्र जाळ्या तसेच खिडक्या फुटलेल्या अवस्थेत आहेत. कार्यालयास रंगरंगोटी करण्याबाबत विद्यमान सरपंच, ग्रामसेवक तसेच ग्रामपंचायत कार्यालयाचे सचिव या नात्याने सर्वस्व जबाबदारी विद्यमान सरपंचासह, ग्रामसेवक मुसळे यांनी कार्यालयाच्या इतर कामास सातत्याने टाळाटाळ केली असल्याचे दिसत आहे.

सविस्तर वृत्त असे की विद्यमान सरपंच व ग्रामसेवकाच्या दुर्लक्षामुळे म्हणजे ग्रामसेवकाच्या निष्काळजीपणामुळे किंवा कामाकडे दुर्लक्ष केल्यामुळे. याचा अर्थ असा होतो की, विद्यमान सरपंच व ग्रामसेवक मुसळे आपल्या कामात योग्य लक्ष देत नाही किंवा आपले

▶ पान २ वर

## मोक्कातील लिडर सतीश चांदणे यास जामीन मंजूर

### ॲड. शिवदर्शन खेडकर (गदळे) यांच्यामार्फत जामिनासाठी केला होता अर्ज

**वडवणी । प्रतिनिधी**

पुणे येथील खडकी पोलीस स्टेशन येथे १७/०९/२०२४ या गुन्ह्याची नोंद पुणे येथील खडकी पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. या प्रकरणी मकोका कायद्यान्वये गँग लीडर/टोळी प्रमुख हितेश उर्फ बापू सतीश चांदणे यास पुणे येथील जिल्हा व अतिरिक्त विशेष सत्र न्यायाधीश यांनी दि. २८/०७/२०२५ रोजी लाकडी दांडक्यासह कोयत्याचा धाक दाखवून घरातील रोकड व दागिने लंपास केल्याप्रकरणातील मोक्कातील आरोपी हितेश उर्फ बापू चंदाणे यास न्यायालयाने जामीन मंजूर केला. त्याने ॲड. शिवदर्शन खेडकर यांमार्फत जामिनासाठी अर्ज केला.



चांदणे याकडून अथवा त्यांच्या सांगण्यावरून काहीही जप्त करण्यात आलेले नाही. त्याचे टॉवर लोकेशन किंवा कॉल डिटेल्स रेकॉर्ड पोलिसांकडून गोळा केलेले नाहीत. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. तो २५ वर्षांचा असून मागील एक वर्षापासून कारागृहात असल्याचा या प्रकरणात युक्तिवाद आरोपी तर्फे ॲड. शिवदर्शन महादेव खेडकर (गदळे) यांनी युक्तिवाद केला व त्यांना सहकार्य, ॲड. एस.आर. सावंत व ॲड. एन.व्ही. शिंदे यांनी काम पाहिले. या गुन्ह्याची नोंद पुणे येथील खडकी पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. गुन्हा भा.नं.स. (भारतीय न्याय संहिता) कलम ३१०,३११,११० इत्यादी अंतर्गत दाखल असुन, प्रामुख्याने डकैती, चोरी, डकैती करताना मृत्यू किंवा गंभीर इजा करण्याचा प्रयत्न, तसेच खुनाचा प्रयत्न या स्वरूपाचा आहे. व एकूण ८ आरोपी आहेत आणि सर्व आरोपी, येरवडा मध्यवर्ती कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहेत.

## शिवाजीराव हार्ट केअर या रुग्णालयात लिफ्ट अपघात प्रकरणी बीडच्या रुग्णालयाला बजावली नोटीस

■ चौधरीसाहेब, जिल्ह्यातील लिफ्टचे इन्स्पेक्शन होणार का?

■ मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी केला होता लिफ्टने प्रवास

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात चार दिवसांपूर्वी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील एका रुग्णालयात आल्यानंतर लिफ्ट पहिल्या मजल्यावरून आदळल्याचा प्रकार घडला होता. याबाबत आता चौकशी सुरू करण्यात आली आहे. धक्कादायक म्हणजे रुग्णालयाने नूतनीकरण न करताच विनापरवाना लिफ्ट सुरू ठेवल्याचे स्पष्ट झाले असून याबाबत विद्युत विभागाने रुग्णालयाला नोटीस बजावली आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे ४ ऑगस्ट रोजी बीडमध्ये दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी नाट्यगृहासमोर असलेल्या शिवाजीराव हार्ट

▶ पान २ वर



## धोंडराई ग्रामपंचायतच्या राजकीय वरदहस्तामुळे कॉम्प्युटर ऑपरेटरचा मनमानी कारभार?

# कॉम्प्युटर ऑपरेटर खाजगी कामात व्यस्त!

# ग्रामपंचायत कार्यालयाचा कारभार घरातुन बेस्ट?

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब, उघडा डोळे बघा नीट?

**गेवराई । प्रतिनिधी**

धोंडराई ग्रामपंचायत विद्यमान सरपंचासह, सदस्य निवडून आल्यापासून कार्यालयातील कॉम्प्युटर ऑपरेटरचा घरातुन कारभार चालवणे हे सध्याच्या परिस्थितीत योग्य नाही. ग्रामपंचायत कार्यालयात काम करणाऱ्या कॉम्प्युटर ऑपरेटरने घरात बसून काम करणे हे अतिशय चुकीचे आहे किरण कदम नावाचा ऑपरेटर खाजगी असलेल्या किराणा दुकानातून ग्रामपंचायत कार्यालयाचे कामकाज पाहत आहे हे करत असताना रक्त लघवी तपासणी करून तपासणी करणाऱ्या पेशंटचे रिपोर्ट घेऊन तळमळीने काम करतात असे दिसून येत आहे पण ग्रामपंचायत कार्यालयाच्या ऑपरेटर कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित राहूनच काम करणे अपेक्षित आहे. ग्रामपंचायतचे कामकाज व्यवस्थित चालण्यासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी हे आवश्यक आहे. मात्र त्यांनी तसे न करता धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयात संगणक या ऑपरेटरच्या चुकीमुळे किंवा गैरसोयीमुळे लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. कधीकधी माहिती वेळेवर मिळत नाही, कामात दिरंगाई होते किंवा काहीवेळा आवश्यक कागदपत्रे मिळत नाहीत. यामुळे नागरिकांची गैरसोय होते. ग्रामपंचायत कार्यालयात कॉम्प्युटर (संगणक) ऑपरेटरच्या कामातील गैरसोयींमुळे लोकांना सतत समस्यांना सामोरे जावे लागते धोंडराई ग्रामीण भागातील लोकांना आवश्यक माहिती किंवा दाखले वेळेवर न मिळणे.कामात जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत वेळ लावणं तसेच विविध कामांसाठी हेलपाटे मारावे लागतात ग्रामपंचायत कार्यालयात लाईट नसल्याचे कारण देत कॉम्प्युटर प्रणाली हाताळण्यात अडचणी येणे किंवा माहिती व्यवस्थित उपलब्ध न देणे असे प्रकार वारंवार घडत असतात चुकीच्या नोंदी किंवा माहितीमुळे नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण होणे. माहिती किंवा दाखल्यांसाठी रक्कम मोजावे लागत आहे या समस्यांमुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे आणि ग्रामपंचायत प्रशासनाकडे तक्रारींचे प्रमाण वाढले आहे.





सविस्तर वृत्त असे की सध्या धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयाचे कामकाज पाहत असताना ते काम विस्कळीतपणे सुरू आहे विविध कागदपत्राची पूर्तता करणे करिता गावातील लोकांना कॉम्प्युटर ऑपरेटर यांच्या घरी जावे लागते घरातून ऑपरेटर हातावरच्या खाजगी कामाबरोबर ग्रामपंचायत कार्यालयाच्या ऑपरेटर म्हणून काम करतात पण शासकीय कार्यालयात ऑपरेटर म्हणून काम करत असताना हे काम घरून करणे अतिशय चुकीचे समजले जाते. नागरिकांना दैनंदिन विविध नोंदी सह ऑपरेटरच्या घरी जाऊन कामे करून घेण्याची वेळ येत आहे ग्रामपंचायत कार्यालयात कॉम्प्युटर ऑपरेटर नसल्यामुळे ऑनलाइन कामे ठप्प झाली आहेत. याचा परिणाम ग्रामस्थांच्या कामांवर होत आहे. यामुळे लोकांना विविध शासकीय योजनांची माहिती मिळण्यात आणि इतर आवश्यक कामांमध्ये अडचणी येत आहेत. धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयातील कम्प्युटर ऑपरेटरचा मनमानी कारभार म्हणजे कम्प्युटर ऑपरेटर त्यांच्या कामाच्या ठिकाणी त्यांच्या अधिकारांचा गैरवापर करून, मनमानी पद्धतीने कारभार करत असेल, तर त्याला कम्प्युटर ऑपरेटरचा मनमानी कारभार असे म्हणता येईल.यामध्ये कामाच्या ठिकाणी नियमांचे उल्लंघन करणे, कर्मचाऱ्यांवरसह, ग्रामस्थावर अन्याय करणे, किंवा कामाच्या ठिकाणी गैरसोय निर्माण करणे गैर आहे म्हणून ऑपरेटरने




कामाच्या वेळेत खाजगी इतर कामांमध्ये वेळ घालवला किंवा कामात निष्काळजीपणा दाखवला. कॉम्प्युटर ऑपरेटरने डेटा किंवा माहितीमध्ये फेरफार केला, त्यामुळे गैरसोय किंवा नुकसान झाले. ग्रामस्थांच्या छोट्या - मोठ्या कामासह, ग्रामविकासाच्या योजनांची अंमलबजावणी आणि इतर शासकीय कामांमध्ये अडचणी येत आहेत. कॉम्प्युटर ऑपरेटरच्या ग्रामपंचायतच्या कार्यालयाच्या गैरहजेरीमुळे कामकाजावर होणारा परिणाम आणि पर्यायी व्यवस्था करण्यासाठी व कॉम्प्युटर ऑपरेटरची गैरहजेरी जास्त दिवसांची असेल, तर तात्पुरत्या स्वरूपात दुसरा माणूस नेमण्याची किंवा इतर कर्मचाऱ्यास काम सोपवण्याची जबाबदारी ग्रामसेवक अधिकारी मुसळे व विद्यमान कु. सरपंच शितल अशोक साखरे यांची असताना अद्याप याबाबत निर्णय न घेतल्यामुळे संशय व्यक्त होत आहे की राजकीय वरदहस्थामुळे किरण कदम नावाच्या कॉम्प्युटर ऑपरेटरला बळ मिळत असल्याने म्हणून घरातून कारभार हाकताना पाहायला मिळतेय. ग्रामपंचायत कार्यालयातील कॉम्प्युटर ऑपरेटरचे काम घरी बसून करता येत नाही.

धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयात नियमितपणे उपस्थित राहून काम करणे आवश्यक आहे तसेच कॉम्प्युटर ऑपरेटरने कार्यालयाच्या माध्यमातून ग्रामस्थांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे आणि त्यांचे अर्ज भरण्यात मदत करणे, जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणीचे अर्ज स्वीकारून त्यांची नोंद करणे, मालमत्ता कर, पाणीपट्टी इत्यादी करांची वसुली करणे आणि त्याचा तपशील ठेवणे, ग्रामपंचायतीमधील आवश्यक कागदपत्रे, पत्रव्यवहार, आणि इतर रेकॉर्ड व्यवस्थित ठेवणे. गरजेचे असताना त्यांनी आपल्या खाजगी कामांत गुंतवत स्वतःला व्यस्त केल्याचे पाहायला मिळते याकडे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी लक्ष्य घालावे अशी मागणी होत आहे.



## 'इच्छुकांनी' साधला श्रावण महिन्याचा मुहूर्त

### धानोरी परिसरात पालेभाज्यांचे वाटप

**तलवाडा । प्रतिनिधी**

पुणे महापालिका निवडणूक काही महिन्यांत कधीही जाहीर होऊ शकते. यामुळे जनसंपर्क वाढविण्यावर इच्छुका उमेदवारांकडून भर दिला जात आहे. अनेकांनी आखाड पार्टीद्वारे आपली ताकद दाखवली. आता, श्रावण महिना सुरू असल्याने हाच मुहूर्त साधत धनंजयभाऊ जाधव फाउंडेशनच्या वतीने कळस, विश्रांतवाडी, धानोरी, भैरवनगर, मुंजाबा वस्ती, लोहगाव परिसरात ११ हजार भाज्यांच्या गड्ड्यांचे वाटप करण्यात आले.

दरम्यान, श्रावण महिन्यात पालेभाज्यांना महत्व असल्याने हा उपक्रम राबिवल्याचे पूजा जाधव यांनी सांगितले. तर, याच प्रभागातील माजी नगरसेवक अनिल उर्फ बॉबी टिंगरे, माजी नगरसेविका रेखाताई टिंगरे, शशीअण्णा टिंगरे यांनी नागरिकांसाठी मोफत देवदर्शनाचे आयोजन केले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांनी अनेक उपक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. निवडणुकीमध्ये धानोरी प्रभाग हा सर्वाधिक खर्च करणारा प्रभाग म्हणून पुणे शहरांमध्ये ओळखला जातो.

## २९ ऑगस्ट मुंबई आंदोलनाच्या निमित्ताने लिंबागणेश येथे चावडीवरील बैठक संपन्न

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार मराठा आरक्षणाच्या प्रमुख मागण्यांसाठी - मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण, कुणबी-मराठा समानतेची घोषणा, ५८ लाख नोंदींची त्वरित अंमलबजावणी, ओबीसी प्रमाणपत्र देण्याची सुलभ प्रक्रिया, आंदोलनातील कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेणे, तसेच कायमस्वरूपी आणि कायदेशीर आरक्षणाची हमी या मागण्यांसाठी दि. २९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या भव्य आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात सकल मराठा समाजाच्या वतीने गावोगावी बैठकांचे आयोजन सुरू असून, काल दि. ०७ गुरुवारी रात्री बीड तालुक्यातील लिंबागणेश व सोमनाथवाडी येथे चावडीवरील बैठका पार पडल्या.

या बैठकीत बीडहून आलेले मराठा सेवक युवराज मस्के पाटील, संजय वाघुले, नाना पवार, अमोल बागलाने, संजय गोडसे यांनी आंदोलनाची रुपरेषा स्पष्ट करत सर्व मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने मुंबईत उपस्थित राहावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. गणेश ढवळे यांनी केले. बैठकीस गावचे सरपंच बालासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, अशोकराजे वाणी, अक्षय वाणी, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, दिनेश जाधव, दत्ता झोडगे, महावीर वाणी, लक्ष्मण आबदार, प्रकाश वायभट, अजय घोलप, बंडु बागल आदी मान्यवर उपस्थित होते.

## राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी बीड जिल्हा संघ निवड चाचणीचे आष्टीत आयोजन

### तालुका क्रीडा संकुल मैदानावर निवड चाचणी; आ. सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन

**आष्टी । प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्याच्या अकलुज येथे १९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या १७ वर्षांखालील राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी बीड जिल्हा संघ निवडण्यासाठी आष्टी येथे निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. ही निवड प्रक्रिया शनिवार दि.९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता, आष्टी-जामखेड रस्त्यालगत हंबर्डे महाविद्यालय शेजारील तालुका



क्रीडा संकुलाच्या मैदानावर होणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन बीड जिल्हा टेनिस क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष तथा आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते होणार असून, या कार्यक्रमाला खेळाडूंसह क्रीडाप्रेमींची उपस्थित राहणार आहेत. या निवड प्रक्रियेमध्ये केवळ १७ वर्षांखालील नव्हे तर १४ वर्षे वयोगट आणि १९ वर्षे वयोगट यांच्यासाठीही बीड जिल्हा संघ निवडला जाणार आहे. निवडलेले संघ बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये करतील. बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवा खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन बीड जिल्हा टेनिस क्रिकेट संघटनेचे सचिव सुशील तांबे, उपाध्यक्ष अविशांत कुमकर यांनी केले आहे.



बीड जिल्हाचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांची किशन तांगडे यांनी सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा देऊन विविध विषयावर चर्चा केली.

पान १ वरून...

### ग्रामसेवक मुसळेच्या हलगर्जीपणामुळे धोंडराईत संताप

कर्तव्य व्यवस्थितपणे पार पाडत नाही, त्यामुळे कामात अडचणी येतात.शासनाच्या विविध योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी विद्यमान लोकप्रतिनिधी व ग्रामसेवकाची असते. त्याच्या दुर्लक्षामुळे लोकांना शासकीय योजनांची माहिती मिळत नाही, आणि त्याचा लाभ घेता येत नाहीग्रामसेवक विविध दाखले, प्रमाणपत्रे, नोंदी इत्यादी देण्याचे काम करतो. त्याच्या दुर्लक्षामुळे लोकांना विविध कामांसाठी त्रास होतो, आणि गैरसोय निर्माण होतें.मनमानी कारभार करत आहे. ते सतत गैरहजर राहिल्याने गावकऱ्यांचे प्रश्न निकाली काढण्यात उशीर होत असल्याचे बोलले जात आहे ग्रामसेवक आणि सरपंच यांच्या स्तरावर संगणमत असल्याची चर्चा ऐकवास मिळत आहे.

### शिवाजीराव हार्ट केअर या रुग्णालयात लिफ्ट अपघात

केअर या रुग्णालयात जाऊन एका रुग्णाची भेट घेतली होती. दरम्यान, या भेटीसाठी रुग्णालयात गेल्यानंतर दुसऱ्या मजल्यावर लिफ्टद्वारे जात असताना लिफ्ट सुरू झाल्यानंतर पहिल्या मजल्यावर पोहोचण्यापूर्वीच २५ सेकंदांमध्येच आदळली होती. क्षमतेपेक्षा जास्त लोक झाल्याने हा प्रकार घडल्याचे सांगितले गेले होते. मात्र लिफ्टच्या क्षमतेइतकेच लोक आतमध्ये होते असा दावा सोबत असलेल्या कार्यकर्त्यांनी केला होता. यावर या प्रकाराची चौकशी करण्याची मागणीही केली गेली होती.

## अजित दादा जादूची कांडी तर नव्हती सत्तेची कांडी तर होती ना?

### ॲड. शफिक भाऊ यांचा खोचक सवाल; उगाच वड्याचे तेल वांग्यावर काढू नका

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड येथील एका कार्यक्रमात बोलताना मागील लोकांवर निष्क्रियतेचा ठपका ठेवत, मागच्या लोकांनी काहीच केले नाही, आम्हाला थोडा वेळ द्या, आम्ही लवकरच सुधारणा करू, असे वक्तव्य केले. मात्र, या वक्तव्यासंदर्भात उपस्थितांनी आणि राजकीय निरीक्षकांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, गेल्या २० वर्षांपासून सत्तेत असणाऱ्या आणि विविध मुख्यमंत्र्यांसोबत उपमुख्यमंत्री म्हणून काम करणाऱ्या अजित पवार यांना स्वतःच्या कार्यकाळाचा विसर पडला की काय?

२० वर्षांचा सत्ताकाळ, तरीही सुधारणांची प्रतीक्षा?

अजित पवार गेल्या २० वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात कळीची भूमिका बजावत आहेत. १९९९ पासून ते वेगवेगळ्या सरकारांमध्ये उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि इतर महत्त्वाच्या खात्यांचे मंत्री म्हणून कार्यरत राहिले आहेत. या काळात त्यांनी पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत काम केले आहे. तरीही, बीडमधील त्यांच्या ताज्या



वक्तव्यात मागील सरकारवर व स्थानिक नेते वर टीका करताना त्यांनी स्वतःच्या दीर्घ सत्ताकाळाचा उल्लेख टाळला. आमच्याकडे जादूची कांडी नाही, असे म्हणत त्यांनी सुधारणांसाठी वेळ मागितला, पण गेल्या वीस वर्षांत बीडच्या विकासासाठी नेमके काय केले, याबाबत त्यांनी मौन बाळगले. यावेळी स्थानिक नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नावर अजित दादांनी मिश्किलपणे भाष्य करण माझ्याकडे काय जादूची कांडी आहे का मला थोडा वेळ द्या असे बेजबाबदार वक्तव्य केले मागील कित्येक वर्षांपासून वेगवेगळ्या माध्यमातून सत्ता उपभोगणाऱ्या जबाबदार मंत्र्यांनी अशा प्रकारचे वक्तव्य करणे म्हणजे सत्तेची थट्टा केल्यासारखे आहे असे परखड मत एम आय एम चे नेते एडवोकेट शफिक भाऊ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे विचारला आहे.

विकासाची गती आणि बीडचा प्रश्न

मात्र, स्थानिक नागरिक आणि विरोधकांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, जर वीस वर्षे सत्तेत असूनही बीडच्या विकासाची गती संथ राहिली, तर सुधारणांसाठी आता वेळ मागण्यामागील कारण काय? बीडमधील वाढती गुन्हेगारी, अपुरी पायाभूत सुविधा आणि बेरोजगारी यांसारख्या समस्यांवर ठोस उपाययोजना का झाल्या नाहीत, असा सवाल उपस्थित होत आहे.

जादूची कांडी नाही, पण सत्तेची कांडी तर होतीच!

बीड मध्ये, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, विधानसभेचे बहुतेक आमदार आताची राष्ट्रवादी व पुर्वीची राष्ट्रवादी मध्ये होते तसेच सत्तेत ही होते मग, आता जादूची कांडी का अठवली..? ॲड. शफिक भाऊ यांनी अजित पवार यांच्या वक्तव्यावर जोरदार टीका केली आहे. गेल्या वीस वर्षांपासून सत्तेत असणाऱ्या अजित पवार यांना आता सुधारणांसाठी वेळ मागण्याची गरज का पडावी? सत्तेची कांडी त्यांच्याच हातात होती, मग विकास कुठे गेला? असा खोचक सवाल एडवोकेट शफिक भाऊ यांनी उपस्थित केला आहे. काही कार्यकर्त्यांनी तर बीडमधील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्या दौऱ्यादरम्यान शेतकरी नेते आणि छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना नजरकैदेत ठेवल्याचा आरोप केला आहे, ज्यामुळे हा दौरा चर्चेचा विषय ठरला.

बारामती, पुणे, पिंपरी चिंचवड सारखा विकास बीड मध्ये आता तरी दिसणार का..? की बीड शहराला जे तुम्ही क्षीरसागर परिवार लादला हे ते पुन्हा सुरू असणार? अजित पवार यांच्या वक्तव्याने आणि त्यांच्या वीस वर्षांच्या सत्ताकाळाने बीडकरांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. वीस वर्षे सत्तेत असूनही जर सुधारणांसाठी वेळ मागावा लागत असेल, तर आतापर्यंत काय झाले? मग बारामती, पुणे, पिंपरी चिंचवड सारखा विकास बीड मध्ये आता दिसणार का..?असा सवाल एम आय एम पक्षाचे नेते एडवोकेट शेख शफिक भाऊ यांनी केला आहे.

## बीड जिल्ह्याच्या विकासाच्या प्रक्रियेत पत्रकारांच्या सहकार्याची गरज : उपमुख्यमंत्री अजित पवार

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांचा ७ ऑगस्ट रोजी बीडमध्ये जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने भव्य दिव्य असा स्वागत समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमात बोलतांना ना.पवार यांनी बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाचा आढावा घेत असताना या प्रक्रियेत पत्रकारांचे सहकार्य आवश्यक असल्याचे सांगितले. येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधुन बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे सुरु करण्याचा प्रयत्न असल्याचे अजित दादांनी या प्रसंगी सांगितले.

हॉटेल निलकमलच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला आ.प्रकाश दादा सोळंके, आ.विजयसिंह पंडित, आ.विक्रम काळे, बीड विधानसभा राष्ट्रवादीचे अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, बीड शहराध्यक्ष अमर नाना नाईकवाडे यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांच्या हस्ते ना.अजित दादा पवार यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देवून यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संतोष मानूरकर यांनी अजित दादांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्यामध्ये झालेल्या विविध विकास प्रकल्पांची माहिती दिली. बीड शहराच्या जायकवाडी बॅक वॉटर योजनेला मान्यता देण्याचे काम अजित दादांच्या नेतृत्वाखाली झाले होते आणि आज बीडचे पालकमंत्री म्हणून विकासाच्या बाबतीत बीड जिल्हा सर्वांगिण प्रगती करत असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी बोलतांना पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी बीड जिल्ह्याच्या सामाजिक आणि भौगोलिक परिस्थितीचा आलेख



मांडला. हा जिल्हा पुरोगामी विचारांचा असून शरद पवार यांच्यानंतर अजित दादा पवार यांना या जिल्ह्याने साथ दिली. या पुर्वी विलासराव देशमुख यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद भुषवले होते. त्यानंतर ते मुख्यमंत्री झाले. तोच योग अजित दादा पवार यांच्या बाबतीत घडून यावा अशी अपेक्षा मुंडे यांनी व्यक्त केली. गतवर्षी दिक्षाभूमी ते मंत्रालयापर्यंत निघालेल्या पत्रकारांच्या संवाद यात्रेने राज्यभरात पत्रकारांची अभुतपुर्व एकजुट झाली असून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी पुढाकार घ्यावा, असे मुंडे म्हणाले.

या कार्यक्रमात बोलतांना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी गेल्या दोन दिवसात जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेत घेण्यात आलेले निर्णय तसेच बैठकांची माहिती दिली. बीड जिल्हा विकासाच्या बाबतीत गतीमान करण्यासाठी माझे प्रयत्न सुरु आहेत. प्रशासनात पारदर्शकता येण्यासाठी चांगल्या अधिकार्यांची नियुक्ती आपण केली आहे. नवीन प्रशासकिय इमारती दर्जेदार पध्दतीने व्हाव्यात यासाठी बांधकाम विभागाचे तज्ञ अधिकारी काम पहात आहेत. बीड शहरातील विद्युत पोल वरील तारांचे जाळे कमी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे शहराचे सौंदर्य आणखी वाढेल. या सर्व गोष्टी करताना काही कठोर निर्णय सुध्दा आम्हाला घ्यावे लागतील. त्यासाठी नागरिकांनी आणि पत्रकारांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. बीड जिल्हा पत्रकार संघाने केलेल्या सत्काराबद्दल समाधान व्यक्त करताना अजित दादा म्हणाले की, काम करत राहणे हा आमचा पिंड आहे. केलेल्या कामाचे प्रदर्शन न करता ही आपली जबाबदारी आहे असे आम्ही समजतो.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.जाधव सर यांनी केले तर आभार प्रदर्शन दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लोकनेताचे संपादक बालाजी तोंडे यांनी परिश्रम घेतले.

### पत्रकार सन्मान योजनेत २० हजार रुपये पर्यंत वाढ

कै.बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेचे मानधन २० हजार रु.पर्यंत वाढवण्यात आले आहे. त्याबद्दल राज्याचे अर्थमंत्री म्हणून ना.अजित दादा पवार यांचा पत्रकार संघाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

### साहित्यीक, कलावंतांची उपस्थिती

बीड जिल्हा पत्रकार संघाने आयोजित केलेल्या अजित दादांच्या स्वागत समारंभाला संगित क्षेत्रातील जेष्ठ गायक भरत अण्णा लोळगे, अनिल हंप्रस, सतीश सुलाखे, प्रकाश मानूरकर तसेच साहित्य क्षेत्रातील डॉ.विद्यासागर पाटांगणकर, प्राचार्य सविता शेटे, नाट्य क्षेत्रातील डॉ.सुधीर निकम,डॉ.संजय पाटील देवळाणकर आदि उपस्थित होते. या सर्व साहित्यीक व कलावंतांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार केला.

### महिला पत्रकारांचे रक्षाबंधन आणि दादांना दिले विमान

पत्रकार संघाच्या कार्यक्रमात महिला पत्रकारांनी अजित दादांना रक्षाबंधना निमित्त राखी बांधली. तसेच बीडमध्ये विमानतळ मंजुर केल्याबद्दल संपादक वैभव स्वामी यांनी दादांना विमानाची प्रतिकृती भेट दिली.

## बीडला १९० कोटींचे कौशल्यवर्धन केंद्र!

### पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजन, तरुणांना कौशल्यविकास प्रशिक्षणाची संधी!



**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील तरुणांना उच्च दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी सुरू करण्यात येत असलेल्या 'सीट्रिपलआयटी' सेंटर (सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन ॲण्ड ट्रेनिंग- कौशल्यवर्धन केंद्र) उपक्रमाअंतर्गत बीड जिल्ह्यातही १९० कोटी रुपये खर्च करून प्रकल्प उभारण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ७) या केंद्राचे भूमिपूजन झाले. या केंद्रातून दरवर्षी ७ ते १० हजार तरुणांना कौशल्यविकासाचे प्रशिक्षण मिळणार आहे. टाटा टेक्नॉलॉजीने २१०० कोटी रुपये आणि राज्य सरकारने ५०० कोटी रुपयांचा सहभाग यात दिला आहे. बीडच्या सेंटरसाठी 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि 'एमआयडीसी' च्या माध्यमातून १५७ कोटी, तर राज्य सरकारकडून ३३ कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. भूमिपूजनप्रसंगी उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार प्रकाश सोळंके, नमिता मुंदडा, संदीप क्षीरसागर, विक्रम काळे, अर्जुन खोतकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, सीईओ जितीन रहमान, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, राष्ट्रवादीचे डॉ. योगेश क्षीरसागर, अविनाश नाईकवाडे, युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष बळिराम गवते, रेखा फड, अमर नाईकवाडे तसेच मान्यवर उपस्थित होते.

> सीट्रिपलआयटी केंद्रामुळे बीड जिल्ह्यात उद्योगपूरक वातावरण तयार होणार आहे. लघू व मध्यम उद्योगांना याचा थेट फायदा होईल. तसेच उद्योजकतेला चालना मिळेल.
>
> **- अजित पवार, उपमुख्यमंत्री**
>
> सरकारने टाटा समूहाकडे शंभर कोटींचा 'सीएसआर फंड' मागितला होता. त्यांनी तब्बल ६५० कोटी दिले. त्यांचे हे महान दातृत्व आहे.
>
> **- उदय सामंत, उद्योगमंत्री**

## शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे फुंकले रणशिंग!

# शिवसैनिकांनो, आम्ही पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी : मंत्री उदय सामंत

**बीड । प्रतिनिधी**



स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा. तळागाळात जाऊन संघटना बांधणी करून पक्ष मजबूत करा. गरज पडेल तिथे आवाज द्या, अगदी शाखेच्या उदघाटनासाठी देखील आम्ही येऊ. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे आपल्यासोबत पूर्ण ताकदीने आहेत, असा विश्वास देत महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी बीड शिवसैनिकांमध्ये प्रचंड जोश निर्माण केला.

काल दि.७ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील हॉ. ग्रँड यशोदा येथे दु २.३० वाजता महाराष्ट्र राज्य उद्योगमंत्री ना. उदय सामंत, शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, शिवसेना उपनेते माजी खा. राहुलजी शेवाळे, शिवसेना उपनेते अर्जुन खोतकर, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीताताई चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्याकडून बीड जिल्ह्याचा आढावा शिवसेना नेत्यांसमोर सादर करण्यात आला. यानंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकांबाबत विचार विनिमय, ध्येय धोरण ठरविण्यात आले. तसेच शिवसेना नेत्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांशी मुक्तसंवाद साधत सर्व समस्या जाणून घेत त्यांना आम्ही तुम्हाला ताकद देतो, तुम्ही संघटना मजबूत करा, सदस्य नोंदणीवर अधिक काम करा, स्थानिक स्वराज्य संस्थांवर भगवा फडकला पाहिजे, असा ठणठणीत आदेश मंत्री ना. उदय सामंत यांच्यासह शिवसेना नेत्यांनी पदाधिकाऱ्यांना देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले.

### पक्षसंघटनेच्या कामात हलगर्जीपणा सहन करणार नाही : संजय मोरे

विधानसभा निवडणुकीच्या भरीव यशानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महत्वपूर्ण टप्पा असून पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्याकरिता सदस्य नोंदणीवर अधिक काम करने गरजेचे आहे. पक्षसंघटनेच्या कामात किंचितही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असे शिवसेना सचिव संजय मोरे यांनी आढावा बैठकीत पदाधिकाऱ्यांना ठणकाउन सांगितले.

### एकनाथ शिंदे सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टांची जाणीव असणारे नेते : भाऊसाहेब चौधरी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवणारा नेता आहे, कार्यकर्त्यांच्या सुख दुःखात सहभागी होणारा नेता आहे. स्व बाळासाहेब ठाकरे आणि आनंदजी दिघे साहेबांच्या संस्काराची शिदोरी घेऊन शिंदे साहेब महाराष्ट्र हितासाठी अहोरात्र धडपड करतायत. यामुळे आपल्याला देखील शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पक्ष संघटन वाढवावे लागणार आहे, असे शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी पदाधिकाऱ्यांना संबोधित केले.

## तपेनिमगाव जिल्हा परिषद शाळेला कोणी शिक्षक देता का? विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान




**टाकरवण । प्रतिनिधी**

शिक्षक नसतील तर शाळाच बंद करा... आम्ही आमच्या पोरांना मेंढ्या नाही तर म्हशी घेऊ... तपे निमगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षकांची रिक्त पद असल्याने शिक्षण विभागाच्या भोंगळ कारभाराविरोधात स्थानिक नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तपे निमगाव (ता.गेवराई) येथील गावाची जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ४थी पर्यंतचे वर्ग असून दहा विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र या शाळेत गेल्या एक वर्षांपासून शिक्षकांची पदे रिक्त असल्याने पटसंख्येवर परिणाम झाला असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. शिक्षण विभागातील अनागोंदी कारभारामुळे नाहक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने अनेक पालकांनी आपले पाल्य दुसऱ्या शाळेत दाखल केले आहेत.

या शाळेत दोन शिक्षक मिळावेत यासाठी गटशिक्षणाधिकारी गेवराई व केंद्रप्रमुख रामपुरी यांना शालेय व्यवस्थापन समितीकडून व पालकांकडून वारंवार शिक्षण विभागात पत्रव्यवहार तसेच तोंडी पाठपुरावा सुरू आहे मात्र रिक्त पदांची पूर्तता होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये शिक्षण विभागाच्या कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. तपे निमगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक नसल्याने अनेक वेळा पाठपुराव्यानंतरही शिक्षण विभागाकडून डोळेझाक केली जात आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तपे निमगाव रामपुरी केंद्रांतर्गत असून या शाळेत चार वर्गाचे विद्यार्थी संख्या दहा असून या शाळेस कायम दोन शिक्षकांची गरज आहे. गटशिक्षणाधिकारी साहेबांनी या शाळेस दोन शिक्षकांची नेमणुक करावी, या मागणीसाठी १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र दिनानिमित्त आपल्या कार्यालयासमोर सकाळी १० वाजता तपेनिमगाव येथील शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप नाडे व गावातील सर्व नागरिक, पालक यांच्यावतीने बेमुदत धरणे अंदोलन करणार आसल्याचे निवेदनात म्हणटले आहे.



**गेवराई :** तालुक्यातील हिरापूर परिसरातील विद्यार्थ्यांना कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी या शाळेत जाण्यासाठी बस सेवा सुरू केल्याबद्दल प्राचार्य अण्णासाहेब थिटे आणि बस चालक, वाहकाचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी परसराम गुंजाळ, लक्ष्मण जाधव, दत्तात्रय मुंजाळ, उत्तरेश्वर कायस्थ, ओमकार प्रभाळे, अमजद पठाण, राजेंद्र वाघमारे, संतोष गुंजाळ, अमोल धुतावळे यांच्यासह शिक्षक राजेश पंडित, शिवाजी धट, विनायक खाडप, सतीश बहीर आदि.

# बीड जिल्हा संतांची भूमी म्हणुन ओळखली जाते

## श्री क्षेत्र चाकरवाडी म्हणजे परमार्थाचे उभे पीक; बालाजी महाराज बोराडे यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये भजन केलं तर पुण्य भेटते. जुने माणसे खूप भाग्यवान असतात. परमार्थाचे उभे पिक हे चाकरवाडी मध्ये आहे. महाराष्ट्रातील नव्हे तर जगातील एकमेव ठिकाण २४ तास अन्नदान सेवा सुरू आहे ते म्हणजे श्री क्षेत्र चाकरवाडी आहे. प्रति वर्षाप्रमाणे विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या आशीर्वादाने आणि ह.भ.प. महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह व बाळनाथ महाराज यांचा पालखी सोहळ्यातील तिसऱ्या दिवसाची कीर्तन सेवा ह.भ.प. बालाजी महाराज बोराडे यांची संपन्न झाली.



जगामध्ये सर्वोत्तम सेवा कोणती असेल तर ती संत सेवा आहे त्या साठी संतांची सेवा करा तुम्हाला कोणत्याच गोष्टीची कमी पडणार नाही. दादा माऊली यांच्या आशीर्वादाने कोणत्याच गोष्टीची कमतरता पडणार नाही. दादा माऊली यांची तुम्ही सेवा करा असा भाविकांना महाराजांनी संदेश दिला. देवाला जर कोणती सेवा आवडत असेल तर ती संत सेवा आहे. जगाच्या पाठीवर उत्तम सेवा कोणती असेल तर ती संत सेवाच आहे. चांगले माणूस बघायचे असेल तर श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये आहे. चांगलं माणूस बनायचं असेल तर ते संप्रदाय आहे. आणि जर परमआनंद कोठे असेल तर तो पण या वारकरी संप्रदायामध्ये आहे. जे माणसे देव, द्वेष, समाजासाठी, देशासाठी जगतात ते अजरामर असतात. पण जे स्वतःच्या स्वार्थासाठी जगतात ते अजरामर राहत नाहीत. चाकरवाडी मध्ये भजन केलं तर पुण्य भेटते. जगात भारतासारखी संस्कृती नाही जगामध्ये संस्कृती च्या बाबती मध्ये ओळखला जाणारा देश म्हणजे भारत देश आहे. सूर्य उगवल्या बरोबर पहिल किरण टाकणारा देश हा भारत देश आहे. महाराष्ट्रला संतभूमी म्हणून ओळखले जाते. परमार्थ मध्ये जात, धर्म, पंत नाही या परमार्थामध्ये सगळ्यांना सारखे मानले जाते ते एकमेव ठिकाण आहे म्हणजे परमार्थ आहे. महाराजांनी सांगितले की माझे पूर्वी जन्मीचे पुण्य आहे म्हणून मला या ठिकाणी सेवा करण्याचे पुण्य लाभले आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे सगळे तीर्थ जर एक ठिकाणी पाहायचे असेल तर ते श्री गुरु यांच्या चरणी पहावे. सगळीकडे भगवान परमात्मा आहे असे एकही ठिकाण सापडणार नाही त्या ठिकाणी भगवान परमात्मा नाही. जर पूजा कोणाची करायची असेल तर श्री गुरु यांची पूजा करा. जगामध्ये उत्तम लाभ होण्याचे ठिकाण म्हणजे संत होय. संताना बघितले तरही लाभ होतो, नमचिंतन, चरण जवळ बसून राहिले तरही लाभ होतो.

यावेळी गायनाचार्य दत्ता महाराज चव्हाण, रेवण महाराज महादेव महाराज रोडे, पिंपळे महाराज, माखले महाराज, हनुमंत महाराज घोलप मृदंगाचार्य अमोल महाराज पवार, आविष्कार महाराज क्षीरसागर तसेच त्रिंबक महाराज शेळके, अनिकेत महाराज अनवाने, प्रशांत महाराज क्षीरसागर, पोलीस पाटील नानासाहेब काकडे, परमेश्वर भोसले सर, पत्रकार अभिजीत पवार, ज्ञानोबा अनवणे, मंचिक पवार, ग्रामसेवक सुरवसे, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# बीड शहरातील कोणताही घटक विकासापासून वंचित राहणार नाही : ना.अजित पवार

## बीड शहरातील विकासापासून वंचित बहुलभागाचा टप्प्याटप्प्याने विकास अजित पवार व आ. विजयसिंह पंडित माध्यमातून होणार : शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**

मागील दोन दिवसापासून महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड जिल्हा मा.ना. अजित दादा पवार साहेब बीड नगरीमध्ये होते या दोन दिवसीय दौऱ्यामध्ये अनेक शासकीय समारंभात विविध विकास कामांचे सुरुवात मा.अजित दादा पवार यांनी केली. बीड शहराला अनेक लोक उपयोगी प्रकल्प उपलब्ध करून दिले व वेगवेगळ्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन भेटी देऊन त्या क्षेत्रातील समस्या जाणून घेतल्या व पुढील कालावधीमध्ये त्या सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ना.अजित दादा पवार यांनी मांडले. सदर दौऱ्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम यांनी मा.आ.धनंजय मुंढे, मा.आ.अमरसिंह पंडित, मा.आ.विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून अल्पसंख्यांक बहुल भागामध्ये अद्यापपणे प्रलंबित असलेल्या मागण्या संदर्भातील निवेदन सादर केले.



यावेळी ना.अजितदादा पवार यांनी बीड शहरातील खासबाग येथे मोठे मैदान, कंकालेश्वर मंदिर परिसर व हजरत शहंशावली दर्गा परिसर या भागातील पायाभूत सुविधा, अल्पसंख्यांक बहुल भागातील रस्ते नाल्या व स्वच्छते संदर्भात अत्यंत जाणीवपूर्वक चांगली पावले उचलून या भागातील विकास करण्यात येईल व यातून कोणताही घटक वंचित राहणार नाही असे आश्वासन दिले ना. अजितदादा पवार यांच्या दोन दिवसीय दौऱ्यामध्ये बीड करांना नव्या विकासाची पाऊलवाट दिसत आहे तसेच शहरातील भुयारी गटार योजना, व अमृत पाणी पुरवठा योजनेतील भ्रष्टाचार व काम पुर्ण करण्यासाठी व स्वच्छता, विद्युत लाइट, विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार असून शहरातील नागरिक अत्यंत सुंदर, सुरक्षित, व नियोजन बंध पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष देण्यात येईल व या पुर्वी च्या लोकप्रतिनिधींकडून विकास न झाल्यामुळे व खुप बॅकलॉग भरावा लागेल व तो नियोजन बंध बॅकलॉग सर्व कामे करून टप्प्या टप्प्याने भरुन काढण्यात येईल असे अजितदादा पवार साहेब यांनी आश्वासन दिले. या शिष्टमंडळात भागवत तावरे, शेख निजाम, शेख अमर, शेख खय्युम इनामदार, शेख नसिर, मोमीन जुबेर, शेख सत्तार इनामदार, सय्यद आजम, शेख कदीर, बळीराम शिराळे, जयंत वाघ, अनेक राष्ट्रवादीपक्षा चे कार्यकर्त्ये उपस्थित होते.

## युनिव्हर्सल इंजिनिअरिंग कॉलेज पालघर येथे असिस्टंट प्रोफेसर पदी नियुक्ती झाल्याबद्दल लक्ष्मण बुद्धेवाड यांचे अभिनंदन

**नांदेड । प्रतिनिधी**



लक्ष्मण बालाजी बुद्धेवाड यांची युनिव्हर्सल इंजिनिअरिंग कॉलेज पालघर येथे असिस्टंट प्रोफेसर म्हणून नियुक्ती झाल्यामुळे अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या राज्य महिला आघाडी प्रमुख सुजाताई पोहरे, समाजसेविका शेख शकीला, डी.एस.वाघमारे, प्रा.डॉ.एस.पी. घुंगरवार, भीम कायदा संघटनेचे विलास गजभारे, डी.के.कांबळे, दत्ता पाटील खानसोळे, सम्राट आढाव, डॉ.गणपत वाडेकर, डॉ.गणपत जिरोणेकर, बालाजी नवघरे, मारोती सांगवीकर, प्रबोधनकार तुकाराम टोम्पे, प्रा.ब.ना.गोईनवाड, आर.जे.वाघमारे, माधव आंबटवाड, पी.एस.गवळे, शिवाजी बुचडे, गुणाजी बुचडे, बबन बुचडे, नामदेव काळे, शंकर सुरेवाड आणि शिवम घोडजकर आदींचा समावेश आहे.

लक्ष्मण बालाजी बुद्धेवाड हे हिमायतनगर तालुक्यातील सवना जहागीर या गावचे भूमिपुत्र असून त्यांची परिस्थिती ही अत्यंत हलाखीची होती. त्यांचे आजोबा पोशट्टी अक्कलवाड आणि आजी इंदिराबाई अक्कलवाड यांनी त्यांना अनाथ विद्यालयात शिकवले. पुढे लक्ष्मण बुद्धेवाड यांचे उच्च शिक्षण मुंबई, पुणे, हैदराबाद येथे पूर्ण झाले, त्यांच्या मेहनतीला यश आले असून आज ते युनिव्हर्सल इंजिनिअरिंग कॉलेज पालघर येथे असिस्टंट प्रोफेसर या पदावर रुजू झाले आहेत. त्यांच्या या यशामध्ये त्यांच्या आई कल्पनाताई बालाजी बुद्धेवाड आणि बंधू आत्राम बुद्धेवाड यांचे देखील कष्ट तेवढेच मोलाचे आहेत. विशेष हे की लक्ष्मण बालाजी बुद्धेवाड यांचे पालकत्व ज्येष्ठ विचारवंत तथा राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार प्राप्त प्रा.राजेश घोडजकर यांच्याकडे असल्याचे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बा.रा.वाघमारे यांनी सांगितले.

# स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांची कार्यकर्ते घडवण्याची परंपरा ना.पंकजाताई पुढे नेतायत






### कोणी गेले तरी संघटना अधिक बळकट : गणेश लांडे

**बीड । प्रतिनिधी**

स्वर्गीय गोपीनाथ मुंडे हे केवळ नेते नव्हते, तर कार्यकर्त्यांना घडवणारे, त्यांना नेतृत्वापर्यंत पोहोचवणारे एक राजकीय विद्यालय होते. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत, ना.पंकजाताई मुंडे यांनी हाच वारसा जोपासत बीड जिल्ह्यात आणि महाराष्ट्रभर हजारो नवे कार्यकर्ते तयार केले आहेत. अलीकडे काही कार्यकर्त्यांनी दुसऱ्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतला असला, तरी पंकजाताईंच्या नेतृत्वावरचा विश्वास कमी झालेला नाही. उलट, त्यांच्या संघटनेतील निष्ठावान कार्यकर्त्यांची ताकद आणि एकजूट अधिक वाढली आहे. कोणी आले, कोणी गेले याने पंकजाताईंच्या राजकीय प्रवासाला कधीच खीळ बसलेली नाही.

गोपीनाथ मुंडेंच्या काळात जशी प्रत्येक कार्यकर्त्याला स्वतःच्या कुटुंबातील सदस्यासारखी वागणूक मिळत होती, तशीच भावना पंकजाताई आजही जपतात. गावागावातून नव्या पिढीतील युवक-युवतींना पुढे आणून त्यांना नेतृत्वाच्या जबाबदाऱ्या देण्याची पद्धत त्यांनी निर्माण केली आहे. यामुळेच बीड जिल्ह्यातील राजकीय पिढ्या पंकजाताईंच्या विचारांनी प्रेरित होत आहेत.

याच संदर्भात गणेश लांडे या तरुण कार्यकर्त्याने सांगितले, कोण कितीही गेले तरी पंकजाताईंची संघटना अधिक बळकट होत असते, कारण आमच्यासारखे निष्ठावान कार्यकर्ते त्यांच्या सोबत ठामपणे उभे आहोत. गेल्या काही वर्षांत पंकजाताईंनी पायाभूत सुविधा, महिलांचे सशक्तीकरण, शिक्षण, आरोग्य आणि पाणी या क्षेत्रांत उल्लेखनीय कामे केली आहेत. पण त्याहूनही मोठं काम म्हणजे कार्यकर्त्यांना नेते करण्याची क्षमता. त्यामुळे बीड जिल्ह्यातील संघटना केवळ टिकून नाही तर दिवसेंदिवस अधिकच मजबूत होत आहे. राजकीय उलथापालथी, पक्षांतरं, तात्पुरते नाराजीचे सूर हे सगळं असूनही पंकजाताईंचा जनाधार आणि संघटनेची ताकद ही गोपीनाथ मुंडेंच्या परंपरेप्रमाणे अढळ उभी आहे.

## प्रकाश आंबेडकर नगर मधील गायरान धारकांना मालकी हक्क देणार : ना.पवार

### अशोक वीर यांच्या मागणीला यश

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री दोन दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर होते. त्यावेळी प्रकाश आंबेडकर येथील रहिवाशी तथा आंबेडकरी चळवळीचे नेते अशोक वीर यांनी शिष्टमंडळासह ना.अजित पवार यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्याची तात्काळ दखल घेत जिल्हाधिकारी यांना आदेशित करण्यात आले आहे.

प्रकाश आंबेडकर नगर येथील सर्व्हे नं.१०५ तरफ पिंगळे येथे स्व.केशर काकु खासदार असताना तहसीलदार, बीड यांच्या मार्फत मागासवर्गीय बहुजन समाजातील महार, मांग, मांगारूडी, वडार, मराठा, मुस्लिम, इतर जातीच्या गोरगरीब जनतेला जागा वाटप करून देण्यात आलेली आहे. तेंव्हा पासून आम्ही तिथे घरे बांधून राहत आहोत, त्या जागेचा मालकी हक्क देवून मालकीचे पी.टी.आर. व ७/१२ देण्यात यावेत. आमची नावे पी.टी.आर. ला नसल्यामुळे आम्ही शासकीय लाभापासून वंचित राहत आहोत. या भागातील रहिवाशांना त्यांच्या हक्काचे पीटीआर देण्याचे आश्वासन दिले व हा प्रश्न तात्काळ मार्गे लावण्याचे ही जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले. याप्रसंगी माजी मंत्री धनंजय मुंडे, आमदार विजयराजे पंडित, योगेश क्षीरसागर व प्रकाश आंबेडकर नगर येथील बहिरवाडी माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते अशोक वीर यांच्यासह शिवाजी अंकुशे, प्रभू हातागळे, राहुल अंकुशे या भागातील नागरिक शिष्ट मंडळात उपस्थित होते.

## पोलीस दलात भरती झालेल्या माजी सैनिकांना फिजिकल ट्रेनिंगमध्ये सूट देऊन संवर्ग बदलण्याबाबतचा शासन निर्णय व्हावा : रविंद्र शिनगारे

**बीड । प्रतिनिधी**

वरील विषया विषयानवी वरील सांगायचे झाले तर तत्कालीन घडलेल्या घटनेबाबत शहीद पंकज घावत हे आर्मी मधून सेवानिवृत्त माजी सैनिक पोलीस दलात भरती होऊन, धुळे येथे पोलीस प्रशिक्षण पूर्ण करत असताना शेवटच्या आठवड्यात. काही किरकोळ कारणास्तव शिक्षा म्हणून शिक्षा म्हणून २५ राऊंड रनिंग करण्याचे सांगितले. तत्पूर्वी सैनिकांनी माफी असावी ही विनंती केली होती परंतु रनिंग करावेच लागेल असे म्हणले असता शेवटी आदेशाचे पालन म्हणून. सैनिकांनी जीवाची बाजी लावत शेवटचे धावले आणि आपल्या वरिष्ठाचा आदेश चे पालन केले. ही घटना अतिशय दुःखद आणि देशाची सेवा करणाऱ्या सैनिकाच्या कुटुंबीयास आपण काय उत्तर देणार. शहीद पंकज घावत यांना परत तर आणू शकणार नाही.

पुन्हा एखादे सैनिक पोलीस भरती फिजिकल ट्रेनिंग दरम्यान शहीद होणार नाहीत याची दक्षता म्हणून माजी सैनिकांना यापुढे होणाऱ्या पोलीस भरतीमध्ये भरती झालेल्या माजी सैनिकांना फिजिकल ट्रेनिंग मध्ये सूट देण्यात यावी. किंवा एखाद्या सैनिकाची पोलीस म्हणून निवड झाल्यानंतर फिजिकल मुळे काही अडचणी निर्माण होत असतील. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता उदाहरणार्थ, संगणकाचे ज्ञान, टंक लेखनाचे कौशल्य असेल तर माजी सैनिकाचा पोलीस शिपाई ऐवजी आस्थापन विभागात लिपिक संवर्गात संवर्ग बदलून देण्याबाबत शासन दरबारी तरतूद व्हावी अशा आशयाची मागणी माजी सैनिक युवराज वाघमारे जे सध्या पोलीस ट्रेनिंग घेत आहेत. यांच्यासह अनेक माजी सैनिकांची असून वरील बाबीचा विचार करता देशाची सेवा करणाऱ्या सैनिकाप्रती मानवतेच्या नात्याने शासन स्तरावर उचित कार्यवाही व्हावी ही पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष रविंद्र शिनगारे यांच्या वतीने करण्यात येत असून योग्य तो शासन निर्णय आपण घ्याल ही विनंती. काल उपमुख्यमंत्री, तथा पालकमंत्री अजित दादा पवार हे बीड जिल्हा दौऱ्यावर आले असता हॉटेल नीलकमल समोर भेट घेऊन निवेदन दिले असता लक्ष घालण्या संदर्भात विनंती केली त्यावेळी अजितदादांनी अर्ज घेतोय म्हणजे काम करण्यासाठीच असे म्हणाले.





## लोकसंख्येच्या निकषावर पात्र असणाऱ्या बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देणार : मंत्री नामदार जयकुमार गोरे

# प्रत्येक तांड्यावर संत सेवालाल महाराज सभागृह व स्मशानभूमीसाठी प्राधान्य द्यावे : रविकांत राठोड

**गेवराई । प्रतिनिधी**

दि.६ ऑगस्ट २०२५ रोजी मंत्रालय, मुंबई येथे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील दालनात संत सेवालाल महाराज बंजारा- लभाणा तांडा समृद्धी योजनेच्या राज्यस्तरीय अशासकीय सदस्यांची महत्वाची बैठक पार पडली या बैठकीत बंजारा समाजासाठी महत्त्वाचे निर्णय घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आठ दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या असून महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्येच्या निकषावर पात्र असणाऱ्या बंजारा- लभाणा तांड्यांना महसुली व स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याचे आश्वासन ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री नामदार जयकुमार गोरे यांनी संत सेवालाल महाराज बंजारा- लभाणा तांडा समृद्धी योजनेच्या राज्यस्तरीय अशासकीय सदस्यांच्या बैठकीत दिले आहे.



राज्यातील अनेक तांड्यांना महसुली दर्जा नाही विशेषता ७०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या तांड्यांना महसुली व ग्रामपंचायत दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर प्रलंबित असल्याचे राज्यस्तरीय अशासकीय सदस्य रविकांत राठोड यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देताच तात्काळ मंत्री महोदयांनी छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त यांना दूरध्वनी द्वारे महसुली दर्जा (काही तांड्यांना नसेल तरी) व स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या प्रस्तावावर तातडीने कारवाई करून लवकरात लवकर सर्व प्रस्ताव ग्रामविकास मंत्रालयाकडे पाठवण्याचे थेट आदेशच दिले त्याचसोबत अमरावती विभागीय आयुक्त, नाशिक विभागीय आयुक्त, पुणे विभागीय आयुक्त यांना सुद्धा दूरध्वनी द्वारे शासकीय अहवाल सादर करण्याचे आदेश दिले यावेळी छत्रपती संभाजीनगर विभागाचा विभागीय कार्य अहवाल रविकांत राठोड यांनी मंत्री महोदयांकडे सुपूर्द केला.

प्रत्येक तांड्यावर निधी देताना संत सेवालाल महाराज सभागृह व स्मशानभूमीसाठी प्राधान्य द्यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भटक्या विमुक्त विभागाचे प्रदेशाध्यक्ष, बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा संत सेवालाल महाराज बंजारा- लभाणा तांडा समृद्धी योजनेचे राज्यस्तरीय अशासकीय सदस्य रविकांत राठोड यांनी यावेळी मंत्री महोदयांकडे केली त्याचप्रमाणे प्रत्येक राज्यस्तरीय अशासकीय सदस्याने महत्त्वाच्या विषयांची मांडणी केली.

संत सेवालाल महाराज बंजारा- लभाणा तांडा समृद्धी योजने अंतर्गत शासनाने तांड्याच्या विकासासाठी यापूर्वी दिलेल्या १३९ कोटी रुपये निधीतील झालेल्या कामांच्या खर्चाचा आढावा घेतला जाईल, यापुढे निधी वाटप करताना प्रत्येक तांड्यावर संत सेवालाल महाराज सभागृह व स्मशानभूमीसाठी प्राधान्य देण्यात येणार असून महसुली गावाचा दर्जा देण्यासाठी पात्र असलेल्या तांड्यांच्या प्रस्तावांना मान्यता देताना कोणतीही तडजोड केली जाणार नाही असे मंत्री नामदार जयकुमार गोरे यांनी सांगितले. बैठकीमध्ये समाजाच्या विविध मागण्यांना मंत्री नामदार जयकुमार गोरे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत यासह राज्यस्तरीय, विभागीय व जिल्हास्तरीय समितीतील अशासकीय सदस्यांना ओळखपत्र देणे, मागच्या शासन निर्णयातील लमान या नावाऐवजी लभाना अशी सुधारणा करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी मंत्री महोदयांनी दिले.

या बैठकीस मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख आरोग्य दूत रामेश्वरजी नाईक, ग्रामीण विकास विभागाचे सह सचिव बेदरे, संत सेवालाल महाराज बंजारा- लभाणा तांडा समृद्धी योजनेचे समन्वयक जगदीश सकवाण, विशेष कार्य अधिकारी निलेश जाधव, धर्मगुरू आमदार बाबू सिंग जी महाराज यांचे चिरंजीव संत सेवालाल महाराज बंजारा - लभाणा तांडा समृद्धी योजनेचे राज्यस्तरीय अशासकीय सदस्य पोहरादेवी येथील महंत जितेंद्र महाराज, धर्मगुरू आमदार बाबुसिंग महाराज यांचे चिरंजीव भक्तराज महाराज, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भटक्या विमुक्त विभागाचे प्रदेशाध्यक्ष, बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा तांडा समृद्धी योजनेचे राज्यस्तरीय अशासकीय सदस्य रविकांत राठोड, पंडित भाऊ राठोड, श्रावण चव्हाण, मोहन चव्हाण, नंदूभाऊ पवार, देवीदास राठोड, भगवान राठोड व ग्रामविकास विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.



## वडवणी भागामध्ये बाबरी मुंडेला बाबरी शेठ असे म्हणतात, अजित पवार यांचे वक्तव्य

### बाबरी मुंडे हा आमच्या पक्षात नवीन पाहुणा आहे, कार्यकर्त्यांनी त्यांना सांभाळून घ्या : आमदार प्रकाश सोळंके

### वडवणीमध्ये उसाळा जनसागर अभूतपूर्व पक्षप्रवेश संपन्न, पिता-पुत्र अजित दादाच्या गटात

**वडवणी । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली वडवणी नगरीचे माजी नगराध्यक्ष बाबरी मुंडे व राजाभाऊ मुंडे यांच्यासमवेत असंख्य सरपंच नगरसेवक कार्यकर्ते यांनी पक्षांमध्ये प्रवेश केला, सदरील पक्षप्रवेश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला. या पक्षप्रवेश सोहळ्यास जिल्ह्यातील अजित दादा पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तालुका अध्यक्ष विविध पक्षाचे विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी आपल्या भाषणात अजित पवार म्हणाले आहेत की, वडवणी येथील बाबरी मुंडे यांना या भागामध्ये बाबरी शेठ असे म्हणतात असे वक्तव्य राज्याचे उपमुख्य मंत्री अजित पवार यांनी भाषणामध्ये केले. यावेळी आमच्या पक्षांमध्ये बाबरी मुंडे यांचे स्वागत, माजलगावचे विद्यमान आमदार प्रकाश सोळुंके म्हणाले आहेत की बाबरी हा आमच्या पक्षात नवीन पाहुणा आहे. कार्यकर्त्यांनी त्यांना सांभाळून घ्यावे असे वक्तव्य प्रकाश सोळंके यांनी केले. सदरील पक्षप्रवेश सोहळ्यास माजलगाव विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वेलतुरीच्या पशुधन पर्यवेक्षकांकडून शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड; बदलीची होतेय मागणी

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

पशुधनाची सेवा करतांना मोफत व वेळेवर उपचार व्हावेत. यासाठी शासनस्तरावरून लाखो रूपये खर्च करून पशुवैद्यकीय दवाखाने उभारले गेले आहेत. पण वेलुतरी सारख्या ग्रामीण भागातील पशुधनाची सेवा करतांना येथील पशुधन पर्यवेक्षक या उपचार केल्याचे पैसे घेत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लाखत आहे. अश्या अधिकाऱ्याची बदली करावी अशी मागणी माजी सैनिक घनश्याम म्हस्के यांनी केली आहे.



आष्टी तालुक्यातील पशुधन विकास कार्यालयाअंतर्गत वेलतुरी येथे श्रेणी २ चा पशुवैद्यकीय दवाखाना असुन शेडाळा, सावरगांव, शेंडगेवाडी, गंगादेवी, वेलतुरी, तागखेल, गहुखेल, अरणविहरा, आठ गावांचा समावेश व ३ हजार ५०० जनावरांची संख्या असलेला दवाखाना आहे. पशुधन पर्यवेक्षक हे पशुधनावर उपचार करण्यासाठी गेल्यानंतर औषधाचा तुडवडा दाखवून बाहेर औषध आणल्याचे कारण पुढे करून सव्वाच्या सव्वा रूपये घेतात. दवाखान्यातील औषध, गोळ्या, सलाईन यासह साहित्य परिसरातील खाजगी सेवादाते यांना देतात. लसीकरण वेळेत केले जात नाही. मर्जीतील लोकांनाच पशुधनासाठी आलेले औषध व इतर साहित्य दिले जाते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील चिंचोटी पाटील येथे राहत असल्याने रात्री अपरात्री पशुधन आजारी पडले तर खाजगी सेवादाते याना बोलवावे लागते. त्याची काम करण्याची पध्दत ही शेतकऱ्यांना वेठीस धरण्याची असून वरिष्ठांकडून याची दखल घेऊन त्याची तात्काळ बदली करून कर्तव्यदक्ष पशुधन पर्यवेक्षकांची नेमणूक करावी नसता पंचायत समितीसमोर उपोषणास बसणार असल्याचा इशारा सावरगांव येथील माजी सैनिक घनश्याम म्हस्के यांनी दिला आहे.

## क्रांती नगर भागातील अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळेकडे पंचायत समिती व नगर पंचायतीचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील क्रांती नगर भागातील कानडी रोड लगत असलेल्या अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळेकडे पंचायत समिती व नगर पंचायतचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे येथील नागरिकांचे व पालकांचे म्हणणे आहे. सदरील शाळा ही १९८५ पासुन येथे कार्यरत असून शासनमान्य सलग्न अंगणवाडी देखील आहे. पहिली ते चौथीचे वर्ग या शाळेत भरवले जात असुन येथे अनुसूचित जाती, जमाती, भटक्या, विमुक्त समाजातील गोर-गरीब विद्यार्थी व विद्यार्थिनी जीव मुठीत घेऊन शिक्षण घेत आहेत.

गेल्या तीनचार वर्षापासुन येथील पालकांनी व नागरिकांनी, पंचायत समिती व नगर पंचायती मध्ये वेळोवेळी विनंत्या,




अर्ज करून देखील फुटलेल्या व बाद झालेल्या पत्रांची दुरुस्ती केली जात नाही. पावसाळ्यामध्ये शाळेच्या खोलीमध्ये पाण्याचे ढव साचतात. त्याचप्रमाणे शाळेच्या बाहेरच्या अंगणात देखील पाणी साचल्यामुळे विद्यार्थ्यांना येथून प्रवास करण्यासाठी प्रचंड अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. चौथी पर्यंत शाळा असल्यामुळे अगदी लहानग्या विद्यार्थ्यांना अनेक संकटाना सामोरे जावे लागत असल्याचे येथील पालक वर्ग सांगतात. तसेच अंगणवाडी व जी.प.प्रा.शाळेच्या अवतीभौवती काही लोकांमार्फत अतिक्रमण होत असल्यामुळे अंगणवाडी आणि शाळेच्या जागेचे मार्कआऊट करून कंपाउंड बांधून, गेट बसवणे गरजेचे आहे. यामुळे मोकाट कुत्रे व इतर जनावरांचा बंदोबस्त होण्यास मदत होईल. पंचायत समिती व नगर पंचायत तसेच गटशिक्षण अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष घालावे अन्यथा येणाऱ्या १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नागरिकांच्या व झोपडपट्टी हक्क संघर्ष समिती केजच्या वतीने तीव्र रस्ता रोको करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे.





## आ. संदीप क्षीरसागरांनी एका बातमीची घेतली दखल; दोन प्रश्नांना दिली बगल : एस.एम.युसूफ

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आमदारांना उद्देशून काही दिवसांपूर्वी शहरातील काही मुख्य रस्त्यांविषयी लिहिलेल्या बातमीची दखल घेत आमदारांनी राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित पवार यांच्या बीड दौऱ्यावेळी रस्त्यांच्या कामांची लांबलचक यादी निवेदन रुपात त्यांच्यासमोर सादर केल्याचे प्रसिद्धी माध्यमातून कळाले. मात्र दुसरीकडे फक्त बीड शहरच नाही तर जिल्हावासियांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला खासबाग-मोमीनपुरा हा मोठा भाग जोडणाऱ्या बिंदुसरा नदीवरील नियोजित पुलाविषयी तसेच ऐतिहासिक महेदवीया दायरा कब्रस्तान च्या संरक्षक भिंतींच्या बांधकामाविषयी च्या प्रश्नांना बगल दिल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात आ. संदीप क्षीरसागर यांनी भली मोठी विकास कामांची यादी दिली असली तरी त्यात खासबाग-मोमीनपुरा जोडणाऱ्या बिंदुसरा नदीवरील नियोजित पुलाच्या कामाचा उल्लेख नाही तसेच जवळपास साडेचारशे वर्षांपासून बीड शहराच्या मोमीनपुरा भागात असलेल्या ऐतिहासिक महेदवीया दायरा कब्रस्तानच्या संरक्षक भिंती बांधून देण्याचा साधा उल्लेख ही केलेला नाही. हे दोन्ही प्रश्न आ. संदीप क्षीरसागर विसरले की, या दोन्ही प्रश्नांना जाणूनबुजून बगल देण्यात आली? असा प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून उपस्थित केला आहे.

### नगर आष्टी साबलखेड या रस्त्यावरील पाऊसाचे पाणी गटारीत जाण्यासाठी मार्ग ठेवलाच नाही : रहेमान सय्यद

# पाणी जाण्यासाठी लवकर उपाययोजना करा; नसता आंदोलन करू

**कडा । प्रतिनिधी**

नगर आष्टी साबलखेड या रस्त्याच्या चालू कामात सध्या दोन ठिकाणी पाऊसाचे पाणी साचून चिखल व पाण्याचा ढव साचत असल्याने रस्त्यावरून ये जा करण्यात लोकांना कसरत करावी लागत आहे संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करूनही दखल घेऊन कायमस्वरूपी उपाय करत नाहीत. थातूरमातूर कामे करून वेळ काढु पणा करत आहेत. हा प्रश्न लवकरच मार्गी लावा अन्यथा याच साचलेल्या चिखलात भोपळा, बेशरमच्या फांद्या घेऊन लोटांगण आंदोलन करणार असे सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. नगर, आष्टी साबलखेड या रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून चालू आहे.

या रस्त्याच्या काम करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गटारी बनवल्या परंतु जेव्हा हा रस्ता बनवला त्यावेळी रस्त्यावरील पाऊसाचे पाणी गटारीत जाण्यासाठी जे पाईप लाऊन जागा केली होती ती रस्त्याच्या खाली बुजवून टाकली त्यामुळे पाऊसाचे पाणी जाण्यासाठी जागाच राहिली नाही. परिणामी कडा गावातील दावलमलिक (शादवल) दर्गा समोर ५० फुटांपेक्षा जास्त लांब व २० फुटांच्या आसपास रूंदी इतका रस्ता कायमच पावसाच्या पाणी व चिखलात भरलेला असतो त्यामुळे या देवस्थानात ये जा करण्यात कसरत करावी लागत आहे.तसेच वाहने हि घसरत आहेत. यामुळे अपघात होण्याची शक्यता जास्त आहे. या ठिकाणच्या साचलेल्या पाणी चिखलाचे फोटो व्हिडिओ संबंधित अधिकाऱ्यांना व्हाट्सअप वर पाठवून विनंती केली परंतु आजपर्यंत कायमस्वरूपी उपाययोजना केल्या नाहीत. या ठिकाणी उपाययोजना केल्या नाहीत तर याच साचलेल्या पाण्या- चिखलात भोपळा, बेशरमच्या फांद्या घेऊन लोटांगण आंदोलन करणार याची नोंद घ्यावी. तसेच कडा या गावातील मोठा पुल बनवला आहे त्या पुलावरही पाण्याचे डबके चिखल साचलेले आहे त्यावर हि उपाययोजना करण्यात यावी.



### मोठे असाल... पण दादा तुम्हीही जनतेचे सेवकच...! आजचा दौराही भंपकच ठरला..

# बीडकर काही बारामतीला आले नव्हते पालकमंत्री पद घ्याच म्हणायला...!

### उपेक्षित बीडकरांना तोडून बोलण्याची गरज नव्हती; बीड शहर बचाव मंचाच्यावतीने सक्त नाराजीचा सूर

**बीड । प्रतिनिधी**

चाळीस वर्षांपासून बीड करांना काहीच न देणारे व लुटणारे सर्व लोकप्रतिनिधी तुमचेच आणि तुमच्याच अवतीभोवती आहेत आणि सर्वकाळ होते. बहुदा आमच्या सर्वांच्या माहितीप्रमाणे १९९९- २००० सालापासून बीड नगरपालिका व विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी तुमच्याच परम नेतृत्वामध्ये व मार्गदर्शनामध्ये काम, कारभार करत होते व करत आहेत. आम्हाला सांगा तेव्हापासून आजपर्यंत निधीच उपलब्ध झाले नाहीत का? २००० साल चे पुणे शहर आम्हाला माहित आहे. गेल्या पंचवीस वर्षात पुण्याचा व बारामतीचा किती कायापालट झाला, किती विकास झाला आणि तुमच्या नेतृत्वामध्ये बीड जिल्ह्याचा बीड शहराचा किती विकास झाला हेही आम्हा सर्वांना माहीत आहे.

विकास कार्यक्रमांमध्ये एवढी तफावत का? आम्ही काय पिढ्यान पिढ्या आयुष्यभर तुमच्याकडे येऊन ऊसच तोडायचेत का?





आम्हालाही तोंड उघडायला लावू नका! बीड जिल्ह्याचे नेतृत्व काय तुम्ही पहिल्यांदाच करत आहेत असं ही काही नाही. तुमच्या राष्ट्रवादी पक्षाचा कायम बीड मतदार संघामध्ये आमदारही राहिलेला आहे आणि नगरपालिकेचा नगराध्यक्षही राहिलेला आहे. जिल्ह्यात इतर अनेक मतदारसंघांमध्येही तुमच्या पक्षाचे अनेक आमदार होऊन गेले व आहेत. तुमच्या नेतृत्वामध्ये काय काय घडलं हे आम्हाला बोलायला लावू नका. कधीच काहीच न मिळालेली, कायमच होरपळून निघालेली, कायमच आयुष्यात वाट्याला संघर्ष आलेली अशी ही नेहमीच कमनशीबी ठरलेली, भोळी भाबडी व गोरगरीब अशी बीडची आमची उपेक्षित जनता आहे. गरीब असलं म्हणजे काय झालं कोणी यावं आणि टपली मारून जावं हेही बरोबर नाही.

तुम्हाला एवढा व्याप सहन होत नाही तर व्याप वाढवून घेता कशाला. आमची बीडची जनता तर म्हणाली नव्हती तुम्हाला, की या आणि बोकांडी बसा आमचं बोकांड मोकळच आहे. तेव्हा अडचण तुमची होती, गरज तुमची होती, तुमच्याजवळ विलाजच उरला नव्हता, कसलाही उपाय उरला नव्हता अशी परिस्थिती तुमच्या पक्षासाठी व तुमच्यासाठी निर्माण झालेली होती. बीडकर काय पत्रिका छापून घेऊन आमंत्रण द्यायला आले नव्हते की तुम्हीच आमचे पालकमंत्री व्हा. आदरणीय दादा तुम्हाला व्याप सहन होत नसेल तर तुम्ही राज्याच व पुणे जिल्ह्यातच बघा. उगाचच आमच्या गोरगरीब बिडकर जनतेवर कशाला राग काढता? भोळ्या आशेला लागलेली जनता ही सरकार म्हणून तुम्हाला नाही मागणार तर कोणाला मागणार? गेल्या ३५ वर्षापासून दिलं नाही आताही देतात का नाही तो प्रश्नच आहे. मग फक्त रस्ताच मागितल्याचा काय राग करायचाय. काय रस्ताच मागितलाय ना काय तुमच्या चाळीस वर्षाच्या कारकीर्दीचा हिशोब थोडीच मागितला आहे? आता आम्ही एक शिकलेलो आहोत जो दे उसका भी भला, जो ना दे उसका भी और भला... माझी सर्व बीडकर भावांड जनतेला कळकळीची विनंती आहे की जे तुमचा मायबाप जनता म्हणून मान ठेवत नसतील, अशा नेत्यांच्या दारात जाऊ नका व त्यांना काही मागुही नका पण लक्षात ठेवून येणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये त्यांना हिसका दाखवल्याशिवाय राहूही नका.

## सावता नगर येथील रस्त्यांच्या बाजूला असलेल्या नालीचे बांधकाम रेंगाळले

### इंजिनीयर चाळक साहेब कामाचा पाठपुरावा कराच

**गेवराई । प्रतिनिधी**

रस्त्याच्या एका बाजूला नाली नसल्याने पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचून नागरिकांना ये-जा करण्याकरिता मोठी अडचण सहन करावी लागत होती. माहिती मिळताच तात्काळ नगरपरिषद विकास कामाच्या अंतर्गत यासाठी आपण कार्य सुरू केले आहे. यामुळे नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी मदत होईल. मात्र सावता नगर येथील नाली कामासाठी खोदुन ठेवलेला खड्डा अजूनही तसाच आहे अद्याप काम सुरू नसल्यामुळे त्या खड्ड्यात पावसाची पाणी साचले आहे त्यामुळे खड्ड्यात लहान मुले पडण्याची भीती निर्माण झाली आहे म्हणून गेल्या एक महिन्यापासून खोदून ठेवलेल्या नाली कामासाठी खड्ड्याकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष पाहायला मिळाले.

सविस्तर वृत्त असे की, सावता नगर येथील दिगंबर टोणपे यांच्या घराच्या बाजूला नालीच्या काम चालू करण्यात आले आहे. काही दिवसापासून बंद पडलेल्या अवस्थेत आहे. या संदर्भात संबंधित ठेकेदाराकडून कामासंबंधी सखोल माहिती घेतली असता अनेक ठिकाणी नालीचे काम करण्यात येणार नसल्याचे लक्षात आले. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये या रोडवर मोठ्या प्रमाणात पाणी साचून याचा त्रास संपूर्ण रहिवाशी यांना होतो, म्हणून रस्त्याच्या दोन्ही बाजूने सर्व ठिकाणी नाली बांधकाम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच येथील जागरूक नागरिकांनी देखील याबाबत माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांच्या जनता दरबारात कळवले होते. संबंधित ठेकेदार व इंजिनिअर यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येत आहे. या अनुषंगाने नगरपरिषद गेवराई येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्री. कर्डिले यांनी सदरील बाब अवगत करून रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित इंजिनिअर यांच्यासह ठेकेदाराला योग्य रस्त्याच्या बाजूस असलेल्या नालीचे काम करण्याच्या सूचना द्याव्यात अशी मागणी होत आहे.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT